## प्रकरण तिसरे

## दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रातील समाजदर्शन व वाङ्.मयीन विशेष.

एकोणिसाव्या शतकातील बरेच वाङ्.मय सामाजिक जाणीवेतून निर्माण झाले आहे. समाजनिष्ठा हा या काळातील वाङ्.मयनिर्मितीचा विशेष होता. या काळातील कथा, कादंबरी, नाटके यातूनही सामाजिक जाणीव ब-याच प्रमाणात दिसून येते. आत्मचरित्र हा वाङ्.मयप्रकार व्यक्तिनिष्ठ असला तरी, या काळातील आत्मचरित्रात तत्कालीन समाज-जीवनाचे दर्शन मोठ्या प्रमाणात आळेले आहे. कारण या कालखंडातील

लेखक तत्कालीन समाजजीवनाशी एकरूप झालेले होते. ते जसे लेखक होते तसे सामाजिक चळवळीतील कार्यकर्तेही असल्याने त्यांच्या लेखनाला सामाजिकतेचे अधिष्ठान प्राप्त होणे स्वाभाविक होते.

लोकोत्तर कर्तृत्वाच्या पुरुषांनीच आत्मचरित्र लिहावे, सामान्य माणसाने लिहू नये असा काहीसा समज एकोणिसाव्या शतकात रूढ असावा, असे दिसते. शिवाय जी आत्मचरित्रे आढळतात ती ही सामाजिक कर्तबगारी गाजवणाऱ्यांचीच. दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र यापैकीच एक. दादोबांनी लोकहितार्थ वृत्तीने आपले विचार व अनुभव आत्मचरित्राच्या रूपाने लिहून ठेवले आहेत. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्राचे स्वरूप तपशीलवार माहितीवजा झाले आहे. तत्कालीन समाज जीवनातील अनेक घटनांची माहिती या आत्मचरित्रातून मिळते. अव्वल इंग्रजी काळाचा संपूर्ण इतिहास नसला तरी, त्या काळातील अनेक उलाढालींची बीजे या ग्रंथात सापडतात.[२] तत्कालीन आत्मचरित्रपर लेखनाचे स्वरूप आणि तत्कालीन समाजजीवन समजावून घेण्यासाठी दादोबाचे आत्मचरित्र उपयुक्त ठरते.

१) दादोबांची लेखनविषयक भूमिका :

दादोबांच्या आत्मचरित्र लेखनामागील भूमिका लोककल्याणाची आहे. त्यांनी आपले सर्व विचार व अनुभव लोकहितार्थ लिहून ठेवले आहेत. त्या आत्मचरित्रातून त्यांनी केलेल्या प्रवासाचे वर्णनही येते. प्रवासात जी स्थळे, तीर्थक्षेत्रे, व्यक्ती, दादोबांना पाहायला मिळाल्या त्याची माहिती इतरांना सांगावी या दृष्टिकोनातून त्यांनी आपले आत्मचरित्र लिहिले आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रीय जीवनात अनेक घडामोडी होत होत्या. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे

घडू लागली होती. या सर्वांचा परिणाम तत्कालीन लेखकांच्या मन: - पटलावर उमटणे स्वाभाविक होते. त्याला दादोबांचे आत्मचरित्रही अपवाद नाही. दादोबा हे एक सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे तत्कालीन समाजामध्ये ज्या घडामोडी होत होत्या त्याचे चित्र या आत्मचरित्रात उमटले आहे. केवळ स्वत:चे जीवन चित्र रेखाटण्यासाठी दादोबांनी लेखणी हातात घेतली असेल असे वाटत नाही. कारण ` स्व ` दर्शनाला आत्मचरित्रात त्यांना कमी महत्त्व मिळाले आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रामागील लेखनाची भूमिकाही केवळ ` स्व ` चित्रणाची न राहाता तत्कालीन समाज जीवनाचे चित्रण घडविणे ही आहे. ती मधून प्रकट होते ती दादोबांची समाजमनस्कता. दादोबांच्या आत्मचरित्रातील पुढील उता-यावरून त्यांची ही भूमिका अधिक स्पष्ट होते. ` बहुत दिवसांपासून माझ्या मनांत असे आले आहे की, आपणास जे जे विचार सूचतील ते ते टीपून ठेवावे म्हणजे कालांतरी केव्हांतरी ते राहिले असता आणि कोणी सूज्ञ व समर्थ पुरूषाच्या हाती लागले असतां, ते लोकहितार्थाच्या कामास कांहीतरी उपयोगी पडतील. देहाची तर शाश्वती व भरवंसा नाही, व आपल्या विचाराप्रमाणे कोणतीही गोष्ट करावयास सध: आपल्या अंगी तितके सामार्थ्य नाही, मग जगन्नियंता जेव्हा ते आणतील तेव्हा आणावो. सधा तर इतकीच शक्ती आहे की, लेखन, शाही व पत्र घेऊन आपणास जे विचार सुचतील ते स्मरणार्थ टिपून ठेवावे. इतकेही न केले तर येथे जनाचा आणि पुढे ईश्वराचा अपराध केल्यासारखे होईल. भगवान या विश्वरूप कुटुंबाचा पिता व नियंता होय, त्याने ज्यापेक्षा या कुटुंबात आपणास जन्म दिला आहे त्यापेक्षा जेणे करून येथे प्रामाणिकपणाचे क्लेशाचे निवारण त्यांत विशेषेकरून आपले मानवजातीचे त्रिविध पापाचे उपशमन होई अथवा होईल असे आपल्या बुध्दीने दिसताहे, असे विचार

आपल्या मनाच्या ठायी उद्भवले असता, ते सांप्रत नाही तर नाही परंतु आपल्या मागेही जनास न कळविता तसेच मनात लपवून ठेवणे आणि ते देहासारखे नाशिवंत नसता त्यासह त्या बरोबर नाशाप्रत पाठविणे हा चौर्यकर्माहून मोठा अपराध होय. मी सांप्रत नाहीतर नाही म्हटले याचे कारण माझ्या कित्येक वाचकांच्या लक्षात आलेच असेल. ते असे की, साधुबुध्दीने पाहता हितकारक विचार सर्वदा लोकास कळवत असावे हा मुख्य धर्म." २

## दादोबांचे आत्मचरित्र : आशय आणि अभिव्यक्ती :

दादोबांच्या आत्मचरित्रात प्रामुख्याने तत्कालीन समाजातील धार्मिक, शैक्षणिक आणि स्त्रीजीवनाचे चित्रण आले आहे. या समाजातील रूढी, परंपरा, संकेत, श्रध्दा इत्यादींचे स्थूलमानाने दर्शन येथे घडते. तत्कालीन धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनाप्रमाणेच आपल्या सहवासात आलेल्या व्यक्तींचे चित्रणही दादोबांनी केले आहे. तीर्थक्षेत्रें, स्थळे यांचे वर्णनही काही ठिकाणी येते. हे आत्मचरित्र म्हणजे तत्कालीन समाजजीवनाचा त्रोटक इतिहासच म्हणता येईल.

नाशिक, मालेगाव, धुळे, महेश्वर, इंदूर इत्यादी शहरांची थोडक्यात माहितीही यात आलेली आहे. धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ देऊन हे आत्मचरित्र रंजक करण्याचा थोडाफार प्रयत्न लेखकाने केला आहे. तसे पाहिले तर दादोबांचे हे आत्मचरित्र म्हणजे सुट्या गद्य अनुभवांची संहिताच आहे. एक एक आठवण स्मरणात येईल तशी लिहून काढली असल्यामुळे त्यात एकसंधता सापडणे अवघड आहे. या कारणामुळेच प्रस्तुत लेखनाचे स्वरूप ठोकळेबाज, विस्कळीत व माहितीवजा वाटते. त्यात कल्पत्मकतेचा अभाव जाणवतो.

या आत्मचरित्रात दादोबांनी आपल्या कुलवृत्ताविषयी व जन्माविषयी थोडक्यात हकिकत सांगितली असून नंतर बालपणातील काही आठवणी निवेदन केल्या आहेत. तत्कालीन शिक्षणपध्दती-बद्दलची थोडोफार कल्पनाही या आत्मचरित्रातून येते. सोसायटीच्या शाळा, एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन इत्यादी शैक्षणिक संस्थांची माहिती आलेली आहे. हरि केशवजी, सदाशिव काशिनाथ छत्रे, घन:श्याम बाबा सोनगीरकर इत्यादी तत्कालीन समाज सुधारकां-विषयीची माहितीही येथे मिळते. दादोबांनी आपल्या लग्नाची माहिती देऊन तत्कालीन समाजातील विवाह पध्दतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. मातोश्रीचा मृत्यू, पितृवियोग आणि कन्यादर्शन इत्यादी प्रसंगाचे चित्रण यात आले असले तरी त्यांचे स्वरूप वस्तुनिष्ठ विवेचनाचे आहे. त्यात कोठेही भावनांचे रंग मिसळलेले नाहीत. होळीसारख्या काही सणांचे व उत्सवांचे वर्णनही या आत्म-चरित्रात आढळते. तात्पर्य, दादोबांचे आत्मचरित्र म्हणजे एक माहिती-वजा पुस्तक असून त्यात १८१४ ते १८४७ पर्यंतचा तत्कालीन समाजाचा इतिहास त्रोटकपणे आलेला आहे.

## समाजदर्शन :

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची समाजस्थिती समजावून घेण्यासाठी दादोबांचे आत्मचरित्र उपयुक्त ठरते. कारण दादोबांनी आपल्या आत्मचरित्रात केवळ 'स्व' दर्शन न घडविता तत्कालीन समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती इत्यादींचे दर्शनही घडविले आहे. स्त्रीजीवन, आर्थिक जीवन, धार्मिक जीवन यांचेही पडसाद या आत्मचरित्रात उमटलेले दिसतात. त्यामुळे दादोबांच्या आत्मचरित्राला काही एक सामाजिक मूल्य प्राप्त झाले आहे. म्हणून यातील प्रत्येक घटकाचा तपशीलवार विचार करणे गरजेचे ठरते.

धार्मिक जीवन :

तत्कालीन समाजामध्ये फकीर, जोगी या सारखे लोक भिक्षा मागण्यासाठी फिरत असत. मनुष्य मरतेवेळेस त्याला यमदूत नेण्यासाठी येत असतात. अशाही काही समजुती या काळच्या समाजामध्ये प्रचलित होत्या. या समाजामध्ये ब्राह्मणाचे प्राबल्य होते. ब्राह्मण वर्गात लहान मुलाची मुंज करण्याची प्रथा होती. दादोबा पांडुरंगांचीही मुंज करण्यात आली होती. यात्रा, उत्सव होत असत. घरोघरी हरिविजय, पंढरी माहात्म्य, शिवलीलामृत हे ग्रंथ वाचले जात. तीर्थयात्रा करणे, श्राध्दविधी करणे, ब्राह्मणांना दक्षिणा देणे इत्यादी कर्मकांडही तत्कालीन समाजामध्ये ब-याच प्रमाणात पसरलेले होते. असे विधी करण्यामागील किंवा त्यांचा आग्रह धरण्यामागील ब्राह्मण मंडळींची भूमिका केवळ पोटार्थी होती. दादोबा नाशिकला गेले असताना तेथील ब्राह्मणांनी त्यांना क्षौरविधी करण्यासाठी आग्रह धरला असता दादोबांनी जे उद्‌गार काढले त्यातून तत्कालीन धार्मिक जीवनाची कल्पना येते. "क्षौरविधी करण्याविषयी आमच्या उपाध्यायांचा व इतर ब्राह्मणांचा फार आग्रह पडला परंतु मी त्यास सांगितले गंगाबाईंत स्नान केले म्हणजे आमचे पाप जाईल किंवा येथे श्राध्दविधी केला असता आमच्या पूर्वजांचा उध्दार होईल असे आम्हास अगदी वाटत नाही. व तशी आमची श्रध्दाही होत नाही. म्हणून त्या खटपटीत तुम्ही मला घालू नका. वरकड आमच्या शक्तीप्रमाणे आम्ही तुम्हास दक्षिणा वगैरे देऊ. ब्राह्मणास आणखी काय पाहिजे. त्यास आमची किंवा आमच्या वडिलांच्या उध्दाराची थोडीच काळजी असते. त्यास त्यांच्या पोटाची काळजी असते. त्याची थोडी सामग्री व्हावी हेच त्यास इष्ट असते." (३) अशाप्रकारे तत्कालीन धार्मिक जीवनाची स्थूल कल्पना या ग्रंथातून मिळते. दादोबांनी केलेल्या या वर्णनातून तत्कालीन धर्मजीवन

आणि त्याविषयी सुशिक्षित लोक विचारवंत यांच्या प्रतिक्रिया पहावयास मिळतात.

ब्राह्मणवर्ग कर्मकांडात रमला होता तो सामान्य जनतेला लुबाडत होता. व आपल्या वंशावळीचे लेखन करणे हा त्यांचा उदर-निर्वाहाचा उद्योग होता. याचा उल्लेखही दादोबांनी आत्मचरित्रात केला आहे. नाशिकचा एक अनुभव सांगताना ते म्हणतात की येथील ब्राह्मण आपली वंशावळ एखाधा वहीमध्ये लिहून ठेवून पराशर ऋषी-पर्यन्त आपल्या पूर्वजांची वंशावळ कशी पोहचते हे सामान्य लोकांना दाखवून देऊन त्यांची फसवणूक करत असतात.दादोबांच्या या विवेचनात उपहासाचीही एक छटा येऊन जाते.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रात इंग्रजी अंमल होता. ख्रिस्ती मिशन-यांचा धर्मप्रसाराला ऊत येऊन हिंदू धर्मातील चालीरीती आचार-विचार यांवर मिशन-यांकडून हल्ले होऊ लागले होते. महाविधालयातून शिकणा-या मुलांच्या मनावर ख्रिस्ती मतांचा प्रभाव पडत होता. परिणामी तरूणांचा स्वधर्मावरील विश्वास उडत होता. तरूण पिढी नास्तिकतेकडे झुकू लागली होती. या धार्मिक संघर्षाच्या काळात नारायण शेषाद्रि व श्रीपत शेषाद्रि या बंधूंनी धर्मांतर केले होते. अशा परिस्थितीत ख्रिस्तीधर्माकडे झुकणा-या तरूणांच्या मनाला हिंदूधर्माचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न या काळात दादोबा पांडुरंग,बाळशास्त्री जांभेकर या सारख्या विचारवंतांनी केला. अशाप्रकारे तत्कालीन धार्मिक जीवनाची स्थूल कल्पना दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रातून येते.

स्त्रीजीवन :
---------

एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवनाचे दर्शनही दादोबांच्या

आत्मचरित्रातून घडते. या काळात नववधूला सासवानणंदाकडून फारच जाच होत असे. दादोबांच्या आईला अशा प्रकारचा जाच झाल्याचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे.(४) या काळात बालविवाह होत असत. अगदी सातव्या आठव्या वर्षीही लग्ने होत. प्रसंगी पाळण्याला बाशिंग बांधले जाई. खुद्द दादोबांची पत्नी आठ वर्षांची होती. या संदर्भात दादोबा म्हणतात, ' अष्टवर्षा भवेद्गौरी ' असे शास्त्रार्थ दाखवून ब्राह्मणांनी या चालीस उत्तेजन दिले. ते इतके की शेवटी मुलांची पाळण्यांत लग्ने लावू लागले.(५) बालविधवा ही तर या काळातील मोठीच समस्या होती. त्यांचे जीवन परावलंबी होते. दादोबांची मावसआजी काशीबाई ही बालविधवा होती. अशा बालविधवांना सासर किंवा माहेर या दोन्हीही ठिकाणी आश्रय दिला जात नसे. त्यांचे जीवन अत्यंत दु:खी कष्टी असे. बाल-विधवांचे दर्शन म्हणजे अपशकून मानला जाई. तत्कालीन समाजातील स्त्री ही अशिक्षित होती. स्त्रीने शिक्षण घेणे हे पाप समजले जाई.

हिंदू धर्माच्या नावाखाली सती जाणे, बालविवाह, देवाच्या रथाखाली जीव देणे, नरबळी असे अमानुष प्रकार तत्कालीन समाजामध्ये रूढ होते. ब्राह्मणांच्या स्त्रियांचे सोवळ्या ओवळ्याचा अतिरेक हा या काळचा आणखी एक विशेष. म्हातान्या परभू लोकांच्या बायकांच्या सोवळ्यांवर टीका करताना बाबूशास्त्री म्हणतात. ' असे तुमच्या लोकांचे सोवळे म्हणजे काय ? सुकटीत सूत सापडते, रांडे कोळणीचा इटाळ झाला ! तुमच्या बायका कोळणीच्या टोपलीतून मेलेले मासे घेतात. त्यांचा त्यास विटाळ होत नाही. परंतु त्या टोपलीत जर का सूत सापडले तर मात्र त्यास विटाळ होतो. असे तुमचे सोवळे (६) स्त्रीने पुनर्विवाह करू नये केल्यास तो धर्मबाह्य समजावा. विधवा स्त्री ने केशवपन करावे. अशा अमानुष चाली या काळात रूढ होत्या. ' पुनर्विवाहाची

बंदी असल्यावरून बहुत स्त्रिया वैधव्यरूप दु:खसागरात बुडून मरतात आणि अत्यंत अनाचार व सहस्त्रावधि हत्या होतात. यास्तव इतर सुधारणुकीस विलंब लागला तरी चिंता नाही, पण या गोष्टी-विषयी सुधारणा होईल तितकी लौकर झाली पाहिजे.(७) असा समाजाला जाग आणण्याचा प्रयत्न विष्णू परशराम शास्त्री पंडित यांनी केला. अशा विधवा स्त्रियांकडून व्यभिचार, बाळहत्या इत्यादी पापे घडत. विधवा स्त्रीने चांगले वस्त्र नेसू नये. दागिने घालू नयेत. चार चौघात बसू नये. मंगळ कार्यास जाऊ नये. सर्व वेळ एखाद्या कोप-यात बसून घालवावा. अशा प्रकारची अत्यंत घृणास्पद वागणूक तिला दिली जात असे. जरठकुमार विवाहामुळे बाळविधवांच्या समस्येची गंभीरता वाढली. त्यामुळे या काळखंडात अशा स्त्रियांच्या समस्यां-विषयी विचार होऊ लागला होता. ' विधवांना पुनर्विवाह करण्यास शास्त्राने मान्यता दिली आहे.' असे विचार विष्णू परशरामशास्त्री पंडितांनी मांडले. विधवा पुनर्विवाहाविषयीच्या पुरस्काराची जाणीव दादोबांच्या मनात ठाम होण्यास ही सामाजिक स्थिती अप्रत्यक्षपणे कारणीभूत असावी. बाबा पद्मनजी या ख्रिस्ती गृहस्थांनी विधवा-विवाहाच्या पुरस्कारार्थ ' यमुनापर्यटन ' ही कादंबरी लिहिली. शास्त्री पंडितांच्या उपयोगा करता विधवापुनर्विवाहाचे समर्थन करणारा ' विधवाश्रुमार्जन ' हा निबंध दादोबा पांडुरंग यांनी संस्कृत भाषेत लिहून या कादंबरीच्या शेवटी जोडला.

बालविवाह, जरठकुमारीविवाह, विधवा पुनर्विवाह या ह्या काळातील स्त्रीजीवनातील महत्वाच्या समस्या. त्या सोबतच अनेक बारीकसारीक छळवाद आणि दुखणी होतीच. उदा. मुलाला पाजण्या-साठी अंगावर दूध येत नाही म्हणून दादोबांच्या आईला घरच्या

वडिल्या-या स्त्रियांचा त्रास होत असे. याचा उल्लेख दादोबांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे. या काळातील स्त्रीचे समाजातील स्थान अत्यंत खालचे होते. ती अशिक्षित होती. शिवाय वर उल्लेखलेल्या दु:खाने व घरकामाने ती पिचून गेली होती असे दिसते. या स्त्रीदु:खाला वाचा फोडण्यासाठी तिला शिक्षण मिळाले पाहिजे, असा विचार तत्कालीन सुशिक्षित युवकांच्या मनात रूजू लागला होता. या संदर्भात दादोबा म्हणतात, " असे चातुर्य आईच्या ठिकाणी पाहिजे. याज करिता आया सुशिक्षित पाहिजेत तरच प्रजा चांगली होते. तेव्हा स्त्री शिक्षणाचा देशकल्याणाशी किती निकट आणि अपरिहार्य संबंध तो पहा [८] स्त्रीने शिकले पाहिजे. तिला शिक्षण देणे गरजेचे आहे अशी भावना आता सुशिक्षितांच्या मनात निर्माण झाली होती.

<u>शैक्षणिक जीवन :</u>

इंग्रजी राज्याचे आगमन आणि मिशन-यांचा धर्मप्रसारार्थ का होईना पण सुरू झालेल्या शाळा यामुळे शिक्षणाची आणि विशेषत: लौकिक विद्यांच्या अध्ययनाबद्दलची आस्था समाजमनात निर्माण होत होती. या काळात पंतोजींच्या खाजगी घरगुती शाळा असत. हे पंतोजी मुलांना छडीचा भरपूर मार देत. मुळाक्षरे, बाराखडी, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार हे धुळपाटीवर शिकवले जात होते. या शाळांना अष्टमी, पौर्णिमा, आमावस्या अशा सुट्या असत. " सुटीच्या आदल्या दिवशी पंतोजीस टिपरीभर तांदूळ आणि एक पैसा दर मुलांनी द्यावा अशी चाल होती.[९] इंग्लीश शिक्षण देणा-याही काही शाळा होत्या. दादोबानी अशाच एका General Assembly's School मध्ये इंग्रजी शिक्षण घेतले होते. इंग्रजांच्या शैक्षणिक कार्याकडे पाहण्याचा तत्कालीन लोकांचा दृष्टीकोणही वेगळा होता.

इंग्रजी लोक आपल्याला एवढया अगत्याने शिकवितात त्याचे कारण कदाचित आपली मुले बाटविणे हे असावे अशी शंका त्यावेळच्या पालकांना येत असे. याचे प्रत्यंतर दादोबांच्या आत्मचरित्रातील पुढील उता-यावरून येते. ' त्यावेळेस एकदोन वर्षे पर्यन्त सर्व मुंबईतील लोक अशी कल्पना आपल्या मनात करू लागले की, आमच्या मुलांस शिकविण्याचे सरकारास इतके काय अगत्य आहे. तेव्हा या धूर्त इंग्रजी सरकारचा यांत काहीतरी मतलब असावा( तो म्हणजे) आमच्या मुलास हुशार करून त्यास पुढे बाटवावे, असा सर्वांचा तर्क धावत होता, म्हणोन ते आपली मुले त्या मोठया शाळेत पाठविण्यास मोठा संशय घेत होते.(१०) दादोबांच्या आत्मचरित्रात एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन – बद्दल बरीच महत्त्वाची माहिती मिळते. या संस्थेमध्ये १८३३ साली Institute परदेशातून मि.जॉनबेल, आणि मि.विल्यम हेंडर्सन अशा दोन शिक्षकांची इंग्लिश शिकविण्यासाठी नियुक्ती केली होती. त्यांचा दरमहा पगार १५० रूपये होता. या दोन शिक्षकांबद्दल दादोबा म्हणतात ' हे दोघे मास्तर फारच उद्योगी आणि मुलास शिकविण्याच्या कामात मन लावून मोठे श्रम घेणारे असे पुरूष होते ................ दोघा मास्तरांनी आपआपले विषय घेऊन शाळेचे काम सात आठ वर्षे-पर्यन्त मोठया श्रमाने व फारच चांगले चालविले. मला जें हे या सर्व विषयात थोडेबहुत ज्ञान झाले ते पहिल्याने यांच्याच पासून सकाळी दहा वरा पासून संध्याकाळी पांच वरा पर्यन्त शाळा शिकविण्याचे काम पुढे रात्री मि. बेल हे आम्हास आपल्या बंगल्यातही दोन तीन तास रसायनाचे वगैरे प्रयोग करून दाखवित.(११) या उता-यावरून तत्कालीन शिक्षकांना शिक्षणाबद्दल किती आस्था होती हे स्पष्ट होते. दादोबांनी मराठीत व्याकरण रचले होते. हा ग्रंथ लिहिण्यास त्यांनी इ.स.१८३४ मध्ये आरंभ केला व १८३६ मध्ये हे लिखाण पूर्ण झाले.

इंग्रजी शाळांतून शिक्षण घेतले म्हणजे धर्मांतर होणारच अशी समजून त्याकाळी होती. इंग्रजी शिक्षण घेणे म्हणजे बाटणे असा समज लोकांच्या मनात रूढ होता. काही मिशनरींनी शिक्षणाबरोबर केलेला धर्मप्रसार व श्रीपत शेषाद्रि सारख्यांनी केलेले धर्मांतर यामुळे हा समज अधिकच दृढ झाला होता. या संदर्भात एक गमतीदार पुरावा दादोबांनी दिला आहे. जेव्हा दादोबा जावऱ्यास नबाबाकडे त्याचे शिक्षक म्हणून गेले होते, तेव्हा नबाबाचे सासरे 'नबाब वजीर दौला' यांच्याशी त्याचे जे संभाषण झाले, ते या दृष्टीने महत्त्वाचे आहे. वजीर दौला याने दादोबांना विचारले की 'आप इंग्रजी झुबान सीखके अबतक हिंदू रहे हो ?' आणि यावर दादोबांनी नबाबाला असे उत्तर दिले की, 'अपने महजब का बदलना यह कुछ पराई झुबान जाननेका खास नतीजा नही है. पराई झुबानमें कुछ महजबके बापद लिखा जाता है. उसके समजनपर उसका मदार है. हासिल कलाम यह है के अपलेहि समजसे मझाहबका तबदील तआल्लुक रखता है.(१२) वरील उताऱ्यावरून तत्कालीन लोकमनाचे व लोकसमजुतीचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे इंग्रजी शिकलेली माणसे धर्मांतर करतात असा जो समज या काळी रूढ झाला होता, त्याला दादोबा अपवाद होते. हेही या वरून स्पष्ट होते.

शिक्षणाच्या संदर्भात तत्कालीन आणखी एक महत्त्वाचा प्रश्न दादोबांच्या आत्मचरित्रातून प्रकट होतो. तो म्हणजे शूद्रांच्या मुलांच्या शिक्षणाचा. शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे असे इंग्रजांचे धोरण होते. त्यामुळे हीन गणल्या गेलेल्या जातीतीलही मुलांना शाळेत प्रवेश मिळू लागला. परंतु वरिष्ठ वर्ग या बाबतीत नाखूश असल्यामुळे शूद्र मुलांचे शिक्षण कसे बंद पाडता येईल याचा विचार करू लागला. दादोबांनी या संबंधी असे म्हटले आहे की, शूद्रांच्या मुलांस नेटिव्ह

एज्युकेशन सोसायटीच्या शाळात प्रारंभी प्रवेश मिळत असे. पण इ.स. १८२६-२७ च्या सुमारास मराठे, कोळी, कुणबी, भंडारी या जातींच्या मुलांना शाळेतून काढून टाकण्याचा हुकूम झाला. दादोबा लिहितात, 'धाकजी दादाजी हे त्यावेळेस वयातीत व मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्याचे म्हणणे असे पडले की, जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढे हुशार झाले तर, उंच जातीच्या लोकांना इंग्रजीत रोजगार मिळणार नाही व त्यांची आपली बरोबरी होत जाईल. हे त्याचे म्हणणे त्या काळच्या बहुतेक लोकांस मोठे शहाणपणाचे व दूर अंदेशीचे असे वाटले. व त्यांची हिंदू लोकांत बरीच वाहवा झाली. त्यांत त्यांच्या जातीत तर फारच झाली.[१३] यातून उच्चवर्णीयांच्यातील जातिद्वेषाची वृत्तीही प्रकट होते. दादोबांच्या आत्मचरित्रातून तत्कालीन समाज जीवन धार्मिक जीवन आणि शैक्षणिक जीवन याचे उमटलेले चित्र असे आहे. दादोबांचा एकूणच समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण सुधारणावादी असल्यामुळे समाजपरिवर्तन व्हावे असे त्यांना वारंवार वाटते. त्यामुळे तत्कालीन सामाजिक घडामोडींचे त्यांनी घडविलेले हे दर्शन एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धाचा अव्वल इंग्रजीतल्या सामाजिक जीवनाचा, इतिहास म्हणून असे लक्षात राहाते तसेच नव्या विचारांच्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या विचार कार्याची दिशाही स्पष्ट करते.

दादोबांचे आत्मदर्शन :

आत्मचरित्र हा वाड्.मय प्रकार आत्मनिष्ठ असल्यामुळे त्यात लेखकाच्या आत्मदर्शनला बरेच महत्त्व असते. आत्मचरित्र म्हणजे त्याच्या स्वत:च्या जीवनाची कहाणी असते. असे असले तरी मराठीतील सुरवातीच्या काळातील ( १९ व्या शतकातील) आत्मचरित्रात माहिती आणि घटना याचे प्राबल्य आहे. दादोबाचे आत्मचरित्रही याला अपवाद

नाही. या आत्मचरित्रातून विशेषा असे आत्मदर्शन घडत नाही. तरी पण जाता जाता दादोबाचे आत्मप्रकटीकरण त्यातून होत असते.

आपल्या लहानपणातल्या आठवणी दादोबांना आनंददायक वाटतात. एखाद्या क्षुल्लक गोष्टीबद्दलही लहान मुलाला फार आनंद वाटत असतो. दादोबा लहान असताना त्यांच्या आईने दिलेला चाकू पाहून त्यांना फार आनंद वाटे. त्या संदर्भात ते म्हणतात, `तो चाकू हातात घेताच किती उडालो, नाचलो आणि घडीघडी जाऊन बाबास व आईस विचारावे की हा माझा चाकू घे, मी आता परत देणार नाही.[१४] यातून त्यांचे लहानपणाचे निरागस बालमन दिसून येते. आईबापांनी मुलाची हौस पुरवावी असे ते म्हणतात. आईबापामध्ये झालेला कलह मुलांच्या दृष्टीने फार वाईट असतो. काही आईबापाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणतात `कित्येक बाप व आया तर मी इतक्या निष्ठूर पाहिल्या आहेत की, मुला देखत आपण चांगला कारभार करून त्यास तसेच घरी कोंडून ठेवून आपण बाहेर मेळे, तमाशे पाहावयास जातात.[१५] यातून त्यांचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो. दादोबांना गोरगरिबाबद्दल कळवळा वाटतो. ते आपल्या लहानपणी दारात आलेल्या भिकाऱ्याला काही ना काही देत असत. लहानपणीचा हा गरिबाविषयीचा कळवळा पुढेही त्यांच्या मनात कायम राहिला होता असे ते सांगतात.

दादोबाचे लग्न तेरा वर्षांचे असताना झाले. त्यावेळी त्यांची बायको आठ वर्षांची होती. `या वयात नवरा म्हणजे काय व नवरी म्हणजे काय हे समजत नसे` असे आपल्याच लग्नाविषयी सांगतानाचा त्यांचा प्रांजळपणा व नि:संकोचपणा लक्षणीय वाटतो. नवविचारांच्या प्रभावाने दादोबांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण झाली. त्यानुसार त्यांच्या वागण्यात पुरोगामित्व आले. हा काळ लक्षात घेता पुरोगामित्वा-

विषयी परंपरावाद्यांनी फारसे चांगले बोलणे अपेक्षित नव्हते. दादोबाचे गुरू बापूशास्त्री दादोबांना नास्तिक म्हणत असत. तरी दादोबाविषयी त्यांना आत्मीयताच वाटावी असा लोभ दादोबांनी संपादन केला होता.

दादोबा आणि त्यांचे गुरू बापूशास्त्री शुक्ल यांची पंचवीस वर्षांनंतर सुरत येथे भेट झाली. त्यावेळी उभयतात झालेला संवाद ऐकण्यासारखा आहे. बापूशास्त्री शुक्ल दादोबांना म्हणतात, "दादया, तुझे केलेले व्याकरण मी पाहिले आणि मला फार संतोष झाला. तसे तुझे दुसरे गुण व विद्वत्तेचा स्तव ऐकून मला फार संतोष होतो. परंतु गड्या तू नास्तिक झालास रे ? तुझ्या आपल्या धर्मावर निष्ठा नाही आणि सध्याच्या लोक व्यवहाराप्रमाणे त्यांचा अर्थ समजावून जर मला दिला असता, तर तो घेणे मला प्राप्त आहे ....(१६) दादोबांच्या विद्वत्तेबद्दल व त्यांच्या चांगुलपणाबद्दल त्यांच्या गुरूंनी येथे मनमोकळेपणाने स्तुती केली आहे. यातून बापूशास्त्रींच्या मनाचाही मोठेपणा व प्रामाणिकपणा दिसून येतो. पण आपला विद्यार्थी नास्तिक झाला आहे. याबद्दल त्यांना थोडीफार खंतही वाटते. पण तो का नास्तिक झाला, हे समजून घेण्या इतपत त्याचे मन उदार व विशाल आहे. उभयतांना समजून घेणारा हा गुरूशिष्यांचा जोडा विरळाच म्हणावा लागेल. शिवाय दोन पिढ्यातील वैचारिक अंतरही यातून स्पष्ट होते. दादोबांची धर्मा-विषयीची कल्पना वेगळी आहे. लोक व्यवहाराप्रमाणे केवळ कर्मकांड म्हणजे धर्म नसून, धर्म म्हणजे समाजाची धारणा करणारे नियम हे त्यांना अभिप्रेत असल्याचा प्रत्यय वरील उद्गारावरून येतो.

एकदा घनःश्याम बाबा सोनगीरकर यांच्यावर दादोबा पांडुरंगांनी एक आरती रचली व त्यांना गाऊन दाखविली त्यामुळे बाबा फार खुश झाले आणि दादोबांच्या वडिलांना म्हणाले, "बापू हा

तुझा मुलगा मोठा बुध्दिमान व दैववान निघेल'[१७] दादोबांच्या वाङ्‌मय निर्मितीचे पहिले उन्मेष यातून प्रकट होतात. त्यांच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वाच्या प्रारंभरूपाचेही दर्शन येथे घडते.

आपल्या मातोश्रीच्या मृत्यूचा भयंकर प्रसंग सांगताना दादोबांच्या सत्त्वशील, प्रेमळ, मातृप्रेमाचा वियोग झालेल्या करूण, दु:खी व कोमल अंत:करणाचे दर्शन घडते. 'तीर्थरूप घरात नव्हते. ते घरी आल्यावर आमच्या घरांत मोठाच कल्लोळ झाला, तो सांगता येत नाही.......... हा मोठा भयंकर प्रसंग मला पहिलाच. सरण कसे रचतात व प्रेतास कसे जाळितात हे मी यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. सरणावर माझ्या आईस निजविली आणि तिचे म्या जे कोमल सौम्य मुख पाहिले तेव्हा तर मला दोघातिघांनी हातात धरिले इतका मी तिच्या शोकाने विव्हल होऊन घाबरून गेलो होतो. माझे तीर्थरूप तर फारच शोक करीत एकीकडे कोनांत बसले होते. त्याजपाशी मीही जाऊन बसलो. तो सर्व दहनाचा विधी संपल्यावर नुसते राहिलेले कोळसे पाहून मी फार रडू लागलो आणि वारंवार म्हणून लागलो की, 'आता माझी यशोदा मला कोठे दिसेल ? कोठेच दिसणार नाही'[१८] दादोबांचे व्यक्तिमत्त्व अशाप्रकारे कोमल, प्रांजळ व करूण होते.

अशाप्रकारे दादोबांचे आत्मदर्शन त्रोटकरूपाने त्यांच्या आत्मचरित्रातून दिसून येते. प्रस्तुत आत्मचरित्राचे एकूण स्वरूप पाहता अशा आत्मदर्शनाला त्यात फारसा वाव मिळणेही शक्य नव्हते. आत्मदर्शन मुद्दाम ठळकपणे करण्याचा प्रयत्न दादोबांनी कोठेही केलेला नाही. हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. या कारणामुळेच त्यात कृत्रिमता आढळत नाही. त्यांचे आत्मचरित्र बाळबोध, माहितीवजा व अनेक घटनांचा तपशील देणारे वाटते. पण यातूनच दादोबांच्या ठिकाणी

असणा-या अनेक गुणांचेही आपल्याला दर्शन होते.

दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रामधील व्यक्तिचित्रण :

आत्मचरित्रकार आपल्या आत्मचरित्रात `स्व` चे चित्रण करताना या `स्व` शी संबंधित इतर व्यक्तींचेही चित्रण करीत असतो. त्याच्या गतायुष्यात ज्या व्यक्ती त्याला भेटल्या, ज्या व्यक्तींशी त्याचा संबंध आला किंवा ज्या व्यक्तींच्या सानिध्यामुळे त्याचे जीवन आकाराला आले अशा सर्व व्यक्तींचे चित्रण त्याच्या आत्मचरित्रात येणे अपरिहार्य असते. या व्यक्तींच्या व त्यांच्या संबंधित घटनांच्या मार्फतच आत्मचरित्रकार आपल्या जीवनाचे दर्शन घडवीत असतो. एखादा लेखक जर सामाजिक कार्यकर्ता असेल तर अशा अनेक व्यक्ती त्याच्या आत्मचरित्रात येतात. दादोबाचे जीवन हे एका सामाजिक कार्यकर्त्याचे जीवन आहे.त्यामुळे दादोबांचा अनेक माणसांशी परिचय होणे स्वाभाविक होते. या सर्व व्यक्ती त्यांच्या आत्मचरित्रात - अधून मधून येत असतात. यातील काही महत्त्वाच्या व्यक्तींचा आपण विचार करू.

(१) नबाब गौस महंमद खान :

दादोबा पांडुरंग यांच्या सान्निध्यात आलेली नबाब गौस महंमदखान ही व्यक्ती आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. हा चौदा पंधरा वर्षांचा तरूण, देखणा मुलगा आहे. दादोबा त्यास शिकविण्यासाठी गेलेले असतात. या मुलाच्या चंचलपणाकडे पाहून तो हुशार असावा असे दादोबांना वाटते. त्याची शरीरयष्टी पाहून त्यांना आनंदही होतो. त्याच्या देखणेपणाचे वर्णन करताना ते म्हणतात की, त्याच्या मुवया दाट होत्या, डोळे चंचल आणि कमानदार होते, आणि केतकीच्या वर्णासारखा त्याचा वर्ण गौर होता. त्याचा चंचलपणा पाहून दादोबांना आनंद वाटतो. एकंदरीत महमंद खान हा हुशार, चंचल, तरूण व त्याच-

प्रमाणे सतत आनंदी असणारा युवक आहे. दादोबांनी त्याचे चित्रण अत्यंत थोडक्या शब्दात पण ठळावदारपणे केले आहे. त्यात सहजता आहे.

(२) मेजर विल्यम बार्थवीक :

जनतेची काळजी घेणारा पण विलासी जीवन जगणारा मेजर विल्यम बार्थवीक हा आपल्या स्वभावामुळे सर्व व्यक्ति चित्रणात ठळून दिसतो. तो विलासी आहे तसा ज्ञानीही आहे. जिज्ञासू आहे. ग्रंथावर प्रेम करणारा आहे. तो आपले ग्रंथालय दादोबांना खुले करून देतो. बार्थवीक तसा मजेदार माणूस आहे. तो भिल्ल जमातीतील स्त्रीपुरूषांच्या बरोबर टिपरी सारखे खेळ खेळतो. त्याची ही रंगेल आणि रंगेलवृत्ती पाहून दादोबांना आश्चर्य वाटते. गुणराशी एका ` वडिलाप्रमाणे जनतेचो काळजी घेणारा हा अधिकारी ` दादोबांच्या अधिक स्मरणात राहतो.

(३) नबाब वजीर दौला :

नबाब वजीर दौला हा ३६ वर्षांचा तरणाताठा मुलगा आहे. त्याची दाढी लांब तर रंग सावळा आहे. तो कुराण आणि शरायत यात पारंगत आहे. पण याचा बाप मात्र दारू आणि रंडीबाजी यात वाहात गेलेला आहे. बापापेक्षा मुलाचे व्यक्तिमत्त्वातील ठळावदारपणा दादोबांनी नेमका प्रकट केला आहे.

(४) सोनगीरकर बाबा :

घन:श्याम बाबा सोनगीरकर हे दादोबांच्या तीर्थरूपांचे गुरू होते. त्यामुळे दादोबांना त्यांच्या बद्दल आदर वाटे. दादोबा यांच्या विषयी लिहितात, ` हे कीर्तन करून निर्वाह करीत असत. यांची कीर्तन

करण्याची शैली फार मजेची आणि मोठ्या उच्च स्वराचे कीर्तन व गायन करावे आणि श्रोत्यांच्या अंत:करणात प्रेम उत्पन्न करण्याची हातवटी यास चांगली साधून गेली होती.' (२०) आपण गुजराथी ब्राह्मण आहोत हे घन:श्याम बाबा कुणाला कळू देत नसत. यांच्या घरातील बायकांचा पोषाखही महाराष्ट्रीय असे. घन:शाम बाबाच्या स्वरूपाचे वर्णनही दादोबा थोडक्यात पण प्रत्ययकारी असे करतात. ' घन:शाम बाबा हे गोरे, उंच बांध्याचे व थोडे पातळ अंगाचे पुरूष होते. त्यावेळेस त्याचे वय सुमारे पंचावन्न वर्षांचे होते.' (२१) घनशाम बाबांचे हे रूप पाहून दादोबा भारावून गेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा दादोबांच्या मनावर उमटला .

(५) <u>भाई परभू :</u>

सोनगीरकर बाबांच्या शिष्यापैकी महत्त्वाचा शिष्य म्हणजे भाई परभू यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि एकूणच जीवन कार्याचे महत्त्व पटवून देताना दादोबा म्हणतात ' मुंबईंत जी इतर शिष्य मंडळी असे त्यांत हे गृहस्थ त्या काळी थोडे पैसेवाले असून त्यांनी गुरूच्या सेवेत आपले पुष्कळ द्रव्य खर्चिले असे त्यावेळी लोक म्हणत असत.' (२२) पैशापेक्षा गुरूभक्ती श्रेष्ठ मानणाऱ्या भाई परभू याचे व्यक्तिमत्त्व काही वेगळे उठून दिसते.

भाई परभू हे पाताणे परभू आहेत. ते वैष्णवाप्रमाणे कानशिलावर मुद्रा लावत व ग्रंथावर प्रेम करीत. यांच्याकडे प्राकृत पोथ्या लिहून घेतल्या जात होत्या. हरि विजय, पंढरी माहात्म्य, शिवलीलामृत भक्तिविजय, दासबोध इत्यादी ग्रंथाचे त्यांनी लेखन करून घेतले होते. त्यांच्या या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा दादोबांना अभिमान वाटतो. या निमित्ताने एकोणिसाव्या शतकात ग्रंथ नकलून घेण्यासंबंधी थोडी माहिती मिळते.

(६) बापूशास्त्री शुक्ल :

मराठी शाळेत शिकत असताना दादोबांना शिकविण्यासाठी बापूशास्त्री शुक्ल हे मास्तर आले होते. दादोबांना व त्यांच्या वर्गातील मुलांना यांची प्रकृती विनोदी वाटे. बापूशास्त्रींच्या विनोदी बोलण्याचा मुलांना कधी राग येत नसे. कारण ते मोकळ्या मनाचे होते. बापूशास्त्रींनी मुलांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली व त्यांना वाचनाचे वेड लावले. ते कर्मकांडावर कडाडून टीका करीत. काही अंशी दादोबांच्या व्यक्तिमत्त्वावर बापूशास्त्री शुक्ल यांचीही छाप आहे. दादोबांना त्याचा मनमोकळेपणा फार आवडे. त्यांच्या हुशारीचा अभिमान वाटे. या संदर्भात ते म्हणतात, " मला स्वभाषेविषयी इतकी गोडी लावली त्यास मुख्य कारण आमच्या तीर्थरूपांची दिनचर्या आणि दुसरे हे बापूशास्त्री."(२३) आपल्या गुरू विषयी दादोबांनी काढलेले हे कृतज्ञतेचे उद्गार लक्षणीय आहेत.

(७) बाळशास्त्री जांभेकर :

सोसायटीच्या शाळांमध्ये दादोबांना बाळशास्त्री जांभेकर यांची ओळख झाली. विद्यार्थी मंडळात यांचे नाव जागत होते. जांभेकरांच्यामुळे दादोबांना इंग्रजी भाषेविषयी आवड निर्माण झाली. दादोबा आणि जांभेकर यांचे संबंध गुरूशिष्याचे होते. तसेच जिव्हाळ्याचे होते. जांभेकर हे सामाजिक कार्यकर्ते होते. बाळशास्त्री जांभेकर हे दादोबांचे स्फूर्तिस्थान होते.

(८) हरिकेशवजी :

दादोबांच्या सहवासात आलेली आणखी एक व्यक्ती म्हणजे हरिकेशवजी. यांना मराठी भाषा चांगली अवगत होती. त्यांची भाषा

प्रौढ व सरस असे. हे जातीने सुतार असून मुंबईचे राहणारे. यांची धर्मावर गाढ श्रध्दा असून स्वभाव अत्यंत गरीब असे. त्यांच्याबद्दल दादोबा म्हणतात, `हरिकेशवजींचा स्वभाव इतका गरीब व शांत होता की, कोणीही त्यास पाहिल्यावर त्याजवर त्यांनी लोभ केल्याशिवाय राहू नये.` (२४) हरिकेशवजी स्वत:ला सोमवंशीय क्षत्रीय म्हणवून घेतात, ते अत्यंत बुध्दिमान होते. त्यांनी मराठीमध्ये `मराठीत विद्येचे उद्देश` `लाभ आणि संतोष`, `सिध्द पदार्थ विज्ञान` इत्यादी प्रौढ व सरस ग्रंथ लिहिले.

(९) सदाशिव काशिनाथ छत्रे :

दादोबांच्या सहवासात आलेले हे एक बुध्दिमान व्यक्तिमत्त्व. इंग्लिश भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी परदेशी भाषेचे सूक्ष्म व शुध्द ज्ञान संपादन केले होते. विशाल बुध्दिमत्ता, सामाजिक कार्याविषयी ओढ आणि चौकसवृत्ती इत्यादी गुणामुळे सदाशिव काशिनाथ छत्रे यांचे व्यक्तिमत्त्व उठावदार दिसते. ते जातीने कोकणस्थ ब्राह्मण होते. लोकसेवा करावी, सामान्य-जनांवर उपकार करावेत, अशी त्यांची इच्छा होती. पण ती अपुरीच राहिली असे दादोबा म्हणतात. त्यांचे हे व्यक्तिमत्त्व त्रोटक स्वरूपात दादोबांनी रेखाटले आहे.

(१०) सयाजीराव गायकवाड :

श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचा सहवास आपल्याला मिळाला याचा दादोबा आवर्जून उल्लेख करतात. सयाजीराव गायकवाडांची भेट घेण्यासाठी दादोबांना चारपाच दिवस रखडावे लागले. त्यामुळे दादोबांना त्यांच्या वर्तणुकीबद्दल चीड येते. पण गुणी माणसे दरबारी ठेवण्याची सयाजीराव गायकवाडांची वृत्ती मात्र दादोबांना आवडते. सयाजीराव गायकवाड यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंचे दर्शन दादोबांच्या

लेखनातून घडते.

(११) मि.ग्रीन :

दादोबांच्यावर जीवापाड प्रेम करणारी व्यक्ती म्हणजे बडोद्याचे कलेक्टर मि. ग्रीन. यांना हिंदूंची जेवण करण्याची पध्दत फार आवडते. त्यांना बुध्दिबळ खेळण्याचा छंद होता. त्याचप्रमाणे गायनाचा व वाद्याचा मोठा शौक असे. ग्रीन साहेबांना असलेली लोककलांची आवड दादोबा येथे स्पष्ट करतात.

(१२) सर रॉबर्टकीथ आर्बथनट :

दादोबांच्या व्यक्तिमत्त्वाला कलाटणी देणारी व्यक्तिरेखा म्हणजे सर रॉबर्टकीथ आर्बथनट ही होय. हे सुरतचे कलेक्टर होते. हे अत्यंत ममताळू होते असे दादोबा म्हणतात. कोणतीही गोष्ट करताना तात्काळ निर्णय न देता ती प्रत्यक्षात करून दाखविणे आणि मग सांगणे हा रॉबर्टकीथ आर्बटनथ यांचा स्वभाव आहे. वचनाला जागणारे रॉबर्टकीथ हे मायाळू आणि ममताळूही आहेत.

(१३) दुर्गाराम मंछाराम :

हे सुरतच्या सरकारी शाळेमध्ये शिक्षक होते. त्यांनी स्वत: एका विधवेशी विवाह करून समाजसुधारणेचे कार्य केले. पुनर्विवाहाला मान्यता मिळावी, अबला स्त्रीचा उध्दार व्हावा यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. ते गणितशास्त्र पारंगत होते.

दादोबांच्या आत्मचरित्रातील व्यक्तींचे हे चित्रण असे त्रोटक आहे. अर्थात गतायुष्यात जाताजाता भेटलेल्या व्यक्तींचे हे रेखाटन आहे, हे लक्षात घ्याला हवे. दादोबांच्या आत्मचरित्रात तत्कालीन घटना प्रसंग

आणि सामाजिक परिस्थिती रेखाटण्यावर भर असल्यामुळे त्यात व्यक्ति-चित्रणाला फारसा वाव नसावा हे स्वाभाविकच आहे. शिवाय ह्या व्यक्ती तशा थोडा काळच दादोबांच्या जीवनात आल्या. आपल्या गतायुष्यातील व्यक्तीचे चित्रण करताना त्या व्यक्तींविषयीच्या दादोबांच्या भावभावनाही येथे ओझरतेपणे व्यक्त झाल्या आहेत.

दादोबांच्या आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रणे ढोबळ व केवळ एखाद्या घटनेची माहिती देण्यासाठी आलेली असतात. ही व्यक्तिचित्रणे परिणामकारक वाटत नाहीत. या व्यक्तिचित्रणातून त्या व्यक्तीचा स्वभाव, गुणदोष पुरतेपणाने प्रकट होत नाही. ती व्यक्ती आपल्या रंग, रूपा सहित आपल्या समोर साकार होत नाही. आत्मचरित्रातील व्यक्तिचित्रण हे अधिक वास्तव व जिवंत असते. इतर ललितकृतीतील व्यक्ति-चित्रणात कल्पनेचे रंग मिसळता येतात. परंतु आत्मचरित्रकारांना सत्य-दर्शनाची भूमिका सोडून दूर जाता येत नाही. त्याला भेटलेल्या व्यक्ती ह्या ख-याखु-या वास्तवातील असतात. दादोबांचे आत्मचरित्रही याला अपवाद नाही. दादोबांनी रेखाटलेले व्यक्तीचे चित्रण त्रोटक, अपूर्ण आणि माहितीवजा असे असलेने अनेक ठिकाणी त्यात रूक्षता आणि अस्पष्टता आली आहे.

प्रसंगचित्रण :

आत्मचरित्रातील प्रसंगचित्रण हे आत्मचरित्रकाराच्या जीवनातील घटनांचे प्रकटन करते आणि त्याद्वारे त्याच्या आत्मदर्शनालाही मदत करते. गतायुष्यातील कोणताही प्रसंग जसा घडला असेल तसा ते सरधोपटपणे सांगत राहतात. त्यामुळे त्यात सत्यता व प्रांजळपणा येतो, पण हृदयस्पर्शित्व नसते. पण आपल्या आत्मचरित्रात दादोबा कोणताही प्रसंग उठावदारपणे

रंगवू शकत नाहीत. त्यांनी चित्रित केलेल्या प्रसंगात भावनात्मकता नसते. त्यामुळे या प्रसंगातून दादोबांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होत नाही. फक्त तत्कालीन समाजाचे दर्शन मात्र घडते. आपल्या लहानपणातील प्रसंग सांगताना सुध्दा ते त्या प्रसंगाकडे तटस्थतेनेच पाहात असतात. लहानपणी त्यांच्या आजीने त्याना पेटी दिली.या प्रसंगाचे वर्णन करताना ते म्हणतात, ' पुढे आजीने एक लहानशी पेटी दिली. त्या पेटीसाठी मी तिची पूर्वी किती काकळूत केली. तो विचार आता मनात आणला म्हणजे मोठा चमत्कार वाटतो. दिवसांतून दहा-विसदा तिच्या पाया पडावे. दीनवाणे तोंड करावे. मागायास धैर्यंतर होऊ नये, मग हळूच तिच्या तोंडाकडेस पाहून म्हणावे, ' बाई मला, तुझी तेवढी पेटी नाही देत.' आणि मग लाजून लागलेच पळावे. काय बाळपणाची मौज' (२५) नाही म्हटलेतरी त्यांच्या बाळपणातील कोमलमनाचे दर्शन वरील प्रसंगातून घडते.

दादोबालिखित सर्व प्रसंग माहितीवजा वाटतात. प्रवास वर्णन करतानासुध्दा ते केवळ माहितीच देत आहेत, असे वाटते. त्यात कलात्मकता नसते. ते ज्या प्रसंगाशी एकरूप होत नाहीत हे तटस्थवृत्तीचे निवेदन वाटते. उदा.' वज्रेश्वरीची यात्रा' हा त्यांनी वर्णन केलेला प्रसंग असाच माहिती-वजा वाटतो. ' एथे ऊन पाण्याची कुंडे आहेत, त्यात एक गोरख कुंड आहे. त्यात आधणाच्या पाण्याइतके नेहमी ऊन पाणी असते. दुसऱ्या कुंडात कमी होत होत शेवटच्या कुंडात कोमट पाणी असते.................... एथे एक लहानशी नदी आहे.ती या दिवसात अगदी सुकून जाते. तिचे नांव वैतर्णा आहे. येथील सर्व लोक या देवीस वज्राबाई म्हणतात.' (२६)

आपल्या मातोश्रीच्या निधनाचा प्रसंग वर्णन करताना दादोबांचा प्रांजळपणा प्रकट होत असला तरी ते वर्णन मनाला स्पर्श करू शकत नाही. त्यातही केवळ माहितीच दिल्या सारखे वाटते. ' तीर्थरूप घरात नव्हे ते

घरी आल्यावर आमच्या घरांत मोठा कल्होळ झाला, तो सांगता येत नाही........ हा मोठा भयंकर प्रसंग मला पहिलाच. मरण कसे रचतात व प्रेतास कसे जाळितात हे मी यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. मरणावर माझ्या आईस निजविली आणि तिचे त्यां ते कोमल सौम्य मुख पाहिले, तेव्हा तर मला दोघातिघांनी हातात धरिले. इतका मी तिच्या शोकाने विवळ होऊन धाबरून गेला होतो ........ तो सर्व दहनाचा विधी संपल्यावर नुसते राहिलेले कोळसे पाहून मी फारच रडू लागलो आणि वारंवार म्हणून लागलो की, 'आता माझी यशोदा मला कोठे दिसेल ? कोठेच दिसणार नाही !' (२७) आपल्या पितृ-वियोगाचा प्रसंगाचा त्यांनी करूण भावनाशील असा रंगविलेला नाही. तो प्रसंग शोकात्मक असला तरी वाचकाच्या अंत:करणाचा ठाव घेईल अशा पध्दतीने चित्रित केलेला नाही." परंतु दरम्यान जो अनर्थ झाला तो सांगवत नाही........ एक आमचे तीर्थरूप गेल्याने आमच्या सर्व कुटुंबाचा मोठाच नाश झाला. त्यावेळेस माझे सर्व भाऊ लहान. भास्कराशिवाय कोणी रोजगार करणारा नव्हता आणि तोही त्या वेळेस नगरांत होता. मीच काय तो वडिल व रोजगारी ' (२८)

दादोबांच्या आत्मचरित्रातील प्रसंगचित्रण ठावदार नसल्याने ते मनाचा वेध घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे या आत्मचरित्रातील प्रसंग मनावर भावणात्मक परिणाम करू शकत नाहीत. त्यांच्या प्रसंगवर्णनामध्ये प्रांजळपणा असतो. सत्यता आणि तपशीलही असतो. आणि तरीही प्रत्ययकारित्व येत नाही. त्यामुळे स्थूल माहितीवजा असे त्या प्रसंगाचे एकंदरित स्वरूप बनते. या प्रसंगचित्रणातून त्यांच्या व्यक्तिमनाचे दर्शन होत नाही. उरते ती तत्कालीन समाजाची माहिती. दादोबांच्या आत्मीयतेचा तेथे अभाव जाणवतो. या प्रसंग चित्रणाला कोठेही ओघवती शैली व विनोदबुध्दीची जोड मिळालेली दिसत नाही. मातृवियोग, पितृवियोग

यासारखे प्रसंग सुध्दा ते माहितीवजा सांगून जातात. अशावेळीसुध्दा त्यांच्या अंत:करणातील दु:ख कारूण्य व्यक्त होत नाही. त्यामुळे त्यात सत्यता येते पण परिणामकारकता जाणवत नाही.

दादोबांची निवेदन पध्दती :

आत्मचरित्राची निवेदनपध्दती अकृत्रिम व तटस्थ असायला हवी. तिला भावनात्मकतेचा स्पर्श आवश्यक हवा. पण भावनेच्या आहारी जाऊन आत्मनिवेदन होता कामा नये. आत्मचरित्रातील निवेदन हे प्रांजल व आत्मीयतेने केलेले असावे.

दादोबा आपल्या जीवनाकडे तटस्थवृत्तीने पाहतात. त्यामुळे त्यांच्या लेखनात आत्मनिरपेक्षता आणि समंजसपणा इत्यादी गुण सहजपणे येतात. त्यामुळेच त्यांच्या निवेदनपध्दतीमध्येही समतोलपणा येतो. असा तोल सांभाळणे वास्तविक फारच अवघड असते. ` आत्मचरित्रकाराचे निवेदन म्हणजे तारेवरची कसरत असते. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही, याबद्दल पदोपदी दक्षता बाळगावी लागते. आणि त्याचबरोबर जास्तीतजास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या भावविशेषाचे, गुणदोषांचे आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची असते, असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते.`(२९) जीवनाकडे अलिप्तवृत्तीने पाहणारे लेखकाचे मन स्वत:च्या गुणदोषाचे कर्तृत्वाचे वर्णन करू शकते. त्यामुळे त्याच्या आत्मचरित्राला अहंमपणाचा दोष लागू शकत नाही. हे जसे खरे, तसेच ते लेखकाचे आत्मदर्शन पुरतेपणी घडवू शकत नाही. हे ही खरे.

आपण आपल्या मित्रांशी बोलत आहोत अशा भावनेने व मोकळ्या मनाने दादोबांनी हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांनी त्यात

आपल्या गुणदोषांचा प्रांजळपणे कबुलीजबाबही दिला आहे. पण असा कबुलीजबाब देत असताना आत्मचरित्रकाराची अवस्था फार बिकट होत असते. गुणाचे दर्शन घडवावेतर आत्मश्लाघेचा दोष येतो आणि प्रामाणिकपणे दोष मांडलेतर फाजील विनयाचा भोंदूपणाचा आरोप येण्याची शक्यता असते असे असते तरी दादोबांनी स्वत:च्या मर्यादा ओळखून हे आत्मचरित्र लेखन केले आहे. त्यामुळे यात आत्मस्तुती नाही आणि फाजीलविनयही नाही. दुष्टपणाचा दिमाख न मिरवता आणि अलंकरणाची हावन न धरता प्रांजळपणे ते आत्मनिवेदन करतात. त्यामुळे या आत्मचरित्राविषयी वाचकांना जिव्हाळा वाटतो.

प्रांजळ निवेदन, मनाचा नितळपणा आणि लेखनातील सुबोधता यामुळे हे साधे निवेदन देखील मनावर आपला ठसा उमटवून जाते. दादोबांच्या व्यक्तिमत्वाचे पदर त्यांच्या काळाशी, समाजाशी अधिक घट्ट विनले गेले असल्यामुळे सामाजिक जीवनाचे दर्शन, संदर्भ त्यापासून अलग करता येत नाही, हे त्याचे एक वैशिष्टयच म्हणायला हवे.

असे असले तरी दादोबांच्या निवेदनाला कोठेही भावनात्मकतेचा स्पर्श दिसून येत नाही. त्याचे आत्मचरित्र म्हणजे एक रूक्ष विवेचन वाटते. त्यात कलात्मकता कोठेही जाणवत नाही. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्राचे स्वरूप एखाद्या माहितीवजा ग्रंथाच्या पातळीवर येऊन पोहचले. आपल्या मातोश्रीच्या निधनाचा किंवा पितृवियोगाचा प्रसंगवर्णन करतानाही त्यात कोठेही करूणा, जिव्हाळा अथवा आत्मीयता जाणवत नाही. हे प्रसंग सुध्दा केवळ माहिती दिल्या सारखे वाटतात. आपल्या अंत:करणाचा ठाव घेईल, वाचकाला अंतर्मुख करील असा एकही प्रसंग त्यांनी निवेदन केलेला नाही. त्यांची निवेदनपध्दती साधी, सोपी व सरळ असली तरी ती ओघवती नाही. तसा तिच्यात कोठेही भावनेचा ओलावा आढळत नाही.

त्यामुळे त्याचे आत्मचरित्र म्हणजे तत्कालीन जीवनाची तपशीलवार नोंद आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

दादोबांची भाषाशैली :

कोणत्याही ललित लेखकाची भाषा साधी, सोपी असावी. त्यात अलंकरण नसावे. त्यामुळे अकारण कृत्रिमता येण्याची शक्यता असते. सर्वसामान्य वाचकाला समजेल अशीच असावी. हा निकष आत्मचरित्रालाही लागू पडतो.

दादोबांच्या आत्मचरित्राची भाषाही याला अपवाद नाही. दादोबांना मराठी भाषेचा अभिमान आहे. त्यांची भाषा घरगुती व चटकदार आहे. तिच्यात प्रौढत्व आहे पण लालित्य नाही. ती स्वाभाविक साधी आणि आत्मनिवेदनास उचित अशीच आहे. ती जितकी प्रांजळ आहे, तितकीच परखड आणि निर्भिड आहे. आपलेपणाच्या मनमोकळ्या स्वरूपाच्या आणि घरगुतीरूपाच्या भाषेमुळे `दादोबांच्या जीवनातील त्यांच्या आत्मनिवदेनातून संयपणा, नेमस्तपणा, बौध्दिक समतोलपणा आणि कलहविमुक्तता इत्यादी स्वभाव वैशिष्ट्ये दिसून येतात.(३०)

दादोबांच्या भाषेसंबंधी प्रा. गं.बा.सरदार म्हणतात, `बाबा पद्मनजी व दादोबा यांची भाषा जुन्या वळणाची असली तरी तत्कालीन राजकीय, सामाजिक, वाङ्.मयीन परिस्थितीशी ती समरस झालेली आहे. म्हणूनच वाचकाला ती आकर्षक वाटते. दादोबांच्या भाषेतील सरलता, सुबोधता आणि सहजता `अरूणोदय` कार बाबा पद्मनजी यांना साधली नाही.` (३१)

दादोबांच्या भाषेत प्रांजळपणा, आणि शालिनता आहे. ते समरस होऊन लिहित असतात. दादोबांच्या ठिकाणी असलेली

चिकित्सक दृष्टी, नि:पक्षपातीपणा, सत्यप्रियता इत्यादी गुणांमुळे हे आत्मचरित्र वाचनीय झाले आहे.

प्रवासवर्णन करताना ते छोटी छोटी वाक्ये वापरात. त्यामुळे त्यात सहजता येते. झाबुआ संस्थानाचे वर्णन त्यांनी अशाच साध्या भाषेत केले आहे. यातील भाषा म्हणजे बाळबोध मराठी आहे. ' झाबुआ हे लहान संस्थान आहे. त्याचे कुळउत्पन्न त्यावेळी सुमारे तीन लक्षाचे आत होते. येथले राजेसाहेब मला वाटते राठोड जातीचे रजपूत असावेत. हे संस्थान डोंगरी व जंगली वस्तीत आहे. जावळ्यापासून दक्षिणेस गुजरातचा प्रांत आहे. तेथून अहमदाबाद, बडोदे, राजपिंपळे, छोटा उदेपूर ही गुजराथेतली संस्थाने '(३२)

दादोबांच्या साध्या भाषेतसुध्दा वास्तव चित्रण निर्माण करण्याची ताकद आहे. एखाधा आनंदाच्या सणाचे वर्णनही ते याच पध्दतीने करतात. ' मग तेथे माझा दहापंधरा दिवस मुक्काम असता माझ्या तीर्थरूपांचे व सासऱ्याचे पत्र टपालातून आले. त्यात कुटुंब प्रसूत होऊन कन्या जन्मल्याचे आनंदाचे वर्तमान वाचले. बाळंतीण व लेकरू चांगले सुरक्षित आहेत. लेकरू फार सुंदर आहे. म्हणून तीर्थरूपाने कळविले. हे माझे पहिलेच लेकरू म्हणून कुटुंबाच्या बाळंतपणाची मला घर सोडल्या पासून काळजी होती. ती आता थोडी दूर झाली. त्या मुलीचे नाव ' कावेरीबाई ' ठेवावे असे वडिलास सुचविल्यावर तिचे नाव ठेविले '(३३) दादोबांची भाषा आपल्या साधेपणाने घरगुतीरूपाने वाचकांशी सहज संवाद साधू शकते. हे या भाषेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

## समारोप :

मराठी साहित्यात आत्मचरित्र लेखनाची पाऊलवाट दादोबां- पासून निर्माण झाली. या आत्मचरित्रात त्यांच्या जीवनाचे १८४७ पर्यन्तची

हकीकत आली आहे. त्यातून दादोबांचा वैयक्तिक जीवनक्रम समजून घ्यायला मदत होते. तत्कालीन जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक इत्यादी क्षेत्रातील बरीच माहिती मिळते. परिणामी एकोणिसाव्या शतकातील अभ्यास करण्यास एक संदर्भ ग्रंथ म्हणून हे आत्मचरित्र निश्चितच उपयोगी पडेल. दादोबा आपल्या गतस्मृतींकडे दूरदृष्टीने पाहतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सावधगिरीच्या वृत्तीचे दर्शन जाणवते. पण भावनेची उत्कटता प्रकट होत नाही. स्वजीवनाचे दर्शन घडविताना इतरांना कोंडयात टाकतील किंवा त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडतील अशी कोणतीही विधाने दादोबांनी या आत्मचरित्रात केलेली नाहीत. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा म्हणावा लागेल. कोणताही प्रसंग आणि त्याचा निरर्थक विस्तार यात दादोबा रमत नाहीत. त्यामुळे त्यांचे हे आत्मचरित्र सुटसुटीत व आटोपशीर झाले आहे. कल्पनेचा आश्रय कुठेही घेतलेला नाही. घटनाचे निवेदन करताना कोठेही नाट्यात्मकता प्रकट होत नाही. दादोबांचे व्यक्तिमत्त्व हे भावनाशील नाही. त्यामुळे त्यांचे आत्मचरित्र एक बाळबोध प्रकृतीनिष्ठ आत्मचरित्र आहे असे वाटते. कारण, दादोबांनी या आत्मचरित्रात आपले मत कुठेही उघड केलेले नाही. स्वत:विषयी एका मर्यादेपलिकडे काही न सांगण्याचे तत्कालीन रीत होती. तिचाही हा परिणाम असावा असे म्हणावयास हरकत नाही. तात्पर्य, दादोबांच्या आत्मचरित्रामध्ये तत्कालीन घटना, प्रसंग व सामाजिक परिस्थिती रेखाटण्यावर अधिक भर असल्यामुळे त्यात `स्व` चित्रणाला फारसे महत्त्व मिळालेले नाही. असे असले तरी मराठी साहित्यात या आत्मचरित्राने आत्मचरित्रपर लेखनाची एक पाऊलवाट निर्माण केली. एकोणिसाव्या शतकाच्या सामाजिक चळवळींचा इतिहास सांगणारा एक संदर्भग्रंथ म्हणून या आत्मचरित्राला बरेच महत्त्व आहे. कारण आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराविषयी या काळात निश्चित संकल्पना रूढ झाली नव्हती. `स्व` विषयी काही सांगण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. नव्या काळाची आव्हाने स्वीकारून त्याला सामोरे जाणाऱ्या, जुन्या स्मृती मनात जपणाऱ्या, स्वकालीन सामाजिक जीवनाची छोटी मोठी स्पंदने टिपणाऱ्या, एका प्रांजळ समाजमनस्क, बाळबोध आणि प्रगल्भही व्यक्तिमत्त्वाचे दर्शन प्रस्तुत आत्मचरित्रातून घडते.

## प्रकरण तिसरे

### - संदर्भ -


१) अ.का. प्रियोळकर, रा.ब.दादोबा पांडुरंग,
प्रस्तावना - के.भि.ढवळे प्रकाशन, मुंबई,
आवृती पहिली, १९४७, पृ.४९.

२) तत्रैव पृष्ठ १ व २

३) तत्रैव पृष्ठ ९२

४) तत्रैव पृष्ठ २

५) तत्रैव पृष्ठ ४३

६) तत्रैव पृष्ठ ७

७) (ज्ञानोदय, १८७६, रा.रा.विष्णू परशराम शास्त्री पंडित,
पुरवणी अंक १) यमुना पर्यटन, बाबा पद्मनजी पृ.१५१.

८) दादोबा पांडुरंग आत्मचरित्र पृष्ठ १० व ११

९) तत्रैव पृष्ठ १८

१०) तत्रैव पृष्ठ २६ व २७

११) तत्रैव पृष्ठ ८२ व ८३

१२) तत्रैव पृष्ठ १२९

१३) तत्रैव पृष्ठ ४६

१४) तत्रैव पृष्ठ ८

१५) तत्रैव पृष्ठ १०

१६) तत्रैव पृष्ठ ३८

१७) तत्रैव पृष्ठ ६५

१८) तत्रैव पृष्ठ ८१

१९) तत्रैव पृष्ठ ११४

२०) तत्रैव पृष्ठ ६३

२१) तत्रैव पृष्ठ ६५

२२) तत्रैव पृष्ठ ६४

२३) तत्रैव पृष्ठ ३७

२४) तत्रैव पृष्ठ ५७

२५) तत्रैव पृष्ठ ८

२६) तत्रैव पृष्ठ ६२

२७) तत्रैव पृष्ठ ८१

२८) तत्रैव पृष्ठ १३२

२९) अ.ना.देशपांडे, मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग-२, आवृत्ती पहिली १९५२ पृष्ठ ५३.

३०) प्रा. गं.बा.सरदार, म.सा.प.अंक-२-२१ १ जून १९४८, रा.ब.दादोबा पांडुरंग

३१) रा.कृ.लागू, 'आत्मचरित्र'चरित्र आठवणी - प्रस्तावना, दादोबा पांडुरंग

३२) अ.का.प्रियोळकर, रा.ब.दादोबा पांडुरंग, प्रथमावृत्ती, के.भि.ढवळे प्रकाशन, मुंबई, पृ.११३.

३३) तत्रैव पृष्ठ ११३.

----०---